**<u>महिलाचे गळयातील मंगळसुत्र व चैन चोरी करणारे सराईत गुन्हेगार गुन्हे शाखा, युनिट २ कडुन जेरबंद</u>**

माननीय, पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी डिसेंबर महिन्यामध्ये महिलांचे गळयातील मंगळसुत्र व चैन चोरीचे प्रकार वाढल्याने हददीत सक्त पेट्रोलिंग करुन चैन चोरी करणारे आरोपींना लवकरात लवकर जेरबंद करणेबाबत आदेश दिले होते. त्यान्वये मंगळसुत्र व चैन चोरी करणारे आरोपींचा शोध घेवुन त्यांना जेरबंद करण्याबाबत गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी कृती योजना तयार केली.

त्याप्रमाणे युनिट २ चे प्रभारी सतिश निकम, पोलीस निरीक्षक, यांनी युनिट २ हददीत तीन पथके तयार करुन चैन चोर व त्यांचे सहकारी आरोपीची बातमीदारामार्फत माहिती घेवुन आरोपींना जेरबंद करण्याबाबत सहकारी यांना आदेश दिले होते. त्यान्वये पो.हवा गडांकुश, पो.हवा. १८६२ केदारी, पो.हवा. ६४० पवार, पो.ना. ३६४ वग्गु, पो.शि. ७३८३ महाजन, पो.शि. ७३६५ जंगिलवाड, पो.शि. ७४४७ फरांदे असे वाकड व हिंजवडी पोलीस ठाणे हददीत पेट्रोलींग फिरत असताना दिनांक २१/१२/२०१७ रोजी सायंकाळी १५.४० वाजण्याचे सुमारास एका निळया रंगाचे २२० सीसी पल्सर मोटार सायकलवर शनी मंदिर ताथवडे पुणे या दिशेने दोन इसम येवुन मारुंजीचे दिशेने जाताना दिसले. सदर इसमांचे मोटार सायकलला नंबर प्लेट नसल्याने सदर इसमांबाबत संशय आला. त्यावेळी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता त्यांनी त्यांची मोटार सायकल जोरात चालवुन पळुन जाऊ लागले तेव्हा सदर मोटार सायकलचा पाठलाग करीत असताना, लक्ष्मी चौक हिंजवडी मारुंजी रोड पुणे येथे आलेनंतर ते मारुंजीगावाचे दिशेने वळत असताना त्यांची मोटार सायकल स्लिप होऊन संशयीत इसम खाली पडले व उठुन पळत असताना त्यांना थोडयाच अंतरावर पकडले. त्यांना नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांची नावे १) राहुल नातु सोळंकी वय २० रा. पठारे वस्ती, अशोक शिंदे यांचे घराचे मागे, लोणी काळभोर, पुणे. २) विक्की काशिनाथ म्हस्के वय २० रा. संत नगर, चर्च समोर, लोणीकाळभोर, पुणे. असे असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांचे ताब्यात असणारी मोटार सायकल ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता अ.नं. १ याचे पॅन्टचे उजव्या खिशातं ३ नग तुटलेली मंगळसुत्र मिळुन आली. त्याबाबत त्यांचेकडे विचारणा केली असता काहीएक माहिती सांगत नसल्याने सदरचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेवुन त्यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सदरचे मंगळसुत्र हे वारजे, सिहंगड, लोणीकंद येथुन महिलांचे गळयातील चोरी केलेले असल्याची व ते विक्रीकरिता हिजंवडी भागात आल्याची कबुली दिली.

त्यानंतर आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी पुणे शहरात निगडी, वाकड, व डेक्कन परिसरात सुध्दा मंगळसुत्र व चैन चोरी केल्याची कबुली देवुन आणखीन दोन मंगळसुत्र काढुन दिलेले आहेत. त्यांचेकडे असलेली बजाज पल्सर २२० हि लोणी काळभोर रेल्वे स्टेशन येथुन चोरी केली असल्याचे कबुल केले आहे. आरोपींनी ज्या ठिकाणी मंगळसुत्र व चैन चोरी केली आहे त्या ठिकाणांची त्यांचेसह समक्ष जागेवर जावुन माहिती घेतली असता सदर आरोपींनी पुणे शहरात ५ ठिकाणी, पुणे ग्रामीण हददीत १ ठिकाणी, असे एकुण ६ ठिकाणी मंगळसुत्र व चैन चोरी व लोणी काळभोर येथे वाहन चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने दाखविलेल्या ठिकाणाबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुन्हयांची माहिती घेतली असता वाकड पो.स्टे.-१, सिहगड पो.स्टे.-१, वारजे पो.स्टे.-१, डेक्कन -१, निगडी -१, तसेच लोणीकंद (पुणे ग्रामीण) -१, लोणी काळभोर (पुणे ग्रामीण) -१, असे ६ चैन चोरीचे व १ मोटार सायकलचा गुन्हा असे ७ गुन्हे दाखल आहेत.

**अशा प्रकारे सदर आरोपीकडुन ६ चैन चोरीचे गुन्हे व १ मोटार सायकलचा गुन्हा असे ७ गुन्हे उघडकीस आणुन एकुण १४० ग्रॅम वजनाचे सोने किंमत ३,९२,०० व बजाज पल्सर मोटर सायकल किंमत रू १,१०,००० असा ५,०२,०००/- रू. किमतीचा ऐंवज जप्त करण्यात गुन्हे शाखा युनिट २ यांना यश आलेले आहे.**

सदरचे आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन आरोपी क्र १. याचेवर २ मोटर सायकल चोरी, ३०७ प्रमाणे दोन गुन्हे, ३२४ प्रमाणे दोन गुन्हे असे एकुण ६ गुन्हे दाखल आहेत. व आरोपी क्र २ याचेवर संगमनेर पोलीस स्टेशन जि. अहमदनगर येथे २ चैन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. सदरचे आरोपी हे चैन चोरी करणारा सराईक गुन्हेगार व सध्या मोका केस मध्ये अटक असलेला इम्रान इराणी याचे सहकारी असुन आरोपी क्र १ हा दुचाकी वाहने चोरून इम्रान इराणी यास पुरवित होता. आरोपी क्र २ हा इम्रान इराणी याचे चारचाकी गाडीवर ड्रायव्हर म्हणुन काम करीत होता. तो १ वर्ष ८ महिने चैन चोरीचे गुन्हयामध्ये जेलमध्ये होता. व आक्टोंबर २०१७ मध्ये जामीनावर सुटलेला आहे. सध्या दोघे मिळुन चैन चोरी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

सदरची कामगिरी ही प्रदीप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त गुन्हे, सुधीर हिरेमठ पोलीस उप आयुक्त आर्थिक व सायबर, समीर शेख सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १, यांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सतिश निकम, सहा.पोलीस निरीक्षक अन्सार शेख, स.पो.फौ. उगले, पो.हवा गडांकुश,पो. हवा. केदारी, पो.हवा. पवार, पो.हवा. पठाण, पो.ना. सावर्डे, पो.ना. वग्गु, पो.शि. महाजन, पो.शि. जंगिलवाड, पो.शि. फरांदे , यांनी केलेली आहे.




गुन्हे शाखा,युनिट-२, पुणे शहर